# निशाणी क्र. ५९ वरील आदेश

प्रतिवादी क्र. ६ याने सदरचा अर्ज त्याचेविरूध्द् झालेला विनाम्हणणे व विनाकैफियत आदेश रद्द होवून त्यांचे कैफियत व म्हणणे स्वीकारणेसाठी दाखल केला आहे. त्यांचे म्हणण्यानुसार, सदरकामी प्रतिवादी क्र. ६ चे वतीने वकिलपत्र दाखल केलेले आहे. मात्र दरम्यानच्या काळात वादी व प्रतिवादीमध्ये तडजोडीबाबत बोलणी सुरू होती तसेच तलाठयांकडून दाव्यासंबंधीचे कागदपत्र मुदतीत न मिळाल्याने प्रतिवादी क्र. ६ विरूध्द दि. ०२/०१/२०२० रोजी विना कैफियत असा आदेश झालेला आहे. कैफियत दाखल करून न घेतल्यास प्रतिवादीच्या न्याय हक्कावर विपरीत परिणाम होणार असून त्याच्या हक्कासही बाध येणार आहे. सबब त्याचेविरूध्द झालेला विना म्हणणे व विनाकैफियतीचा आदेश रद्द करणेत येवून त्यांचे म्हणणे व कैफियत दाखल करणेस परवानगी मिळावी अशी विनंती प्रस्तुत प्रतिवादीने केली आहे.

२. वादीने सदर अर्जास म्हणणे दाखल केले आहे. त्याच्या म्हणण्यानुसार, प्रतिवादीचा अर्ज खोटा व खोडसाळ आहे. अर्जात नमूद कारण संयुक्तीक नाही. सबब अर्ज नामंजूर करणेत यावा अशी विनंती वादीने केली आहे.

३. वादी आणि प्रतिवादी क्र. ६ तर्फे विद्वान विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकण्यात आला.

४. सदर दावा वाटपाकरीता दाखल करण्यात आला आहे. सदरचा दावा गुणावगुणावर निकाली होणे गरजेचे व आवश्यक आहे. न्यायतत्वाच्या दृष्टीकोनातून दाव्याचे स्वरुप पाहता प्रस्तुत प्रतिवादी यांना याच न्यायालयात त्यांची बाजू मांडण्याची संधी देणे आवश्यक वाटते. त्यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी दिल्यास वाद मुद्दयाचे निवारण गुणवत्तेवर होणार आहे.

त्यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी नाकारल्यास नैसर्गिक न्यायतत्वाचे विरूध्द् होईल. त्यामुळे नैसर्गिक न्यायतत्वाचे विरूध्द् त्यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी नाकारल्यास त्यांना न्यायदान नाकारल्यासारखे होणार आहे. मात्र झालेल्या विलंबाबाबत त्यांनी वादीस खर्च देणेबाबत आदेश पारित करणे न्यायोचित वाटते. सबब, प्रस्तुतचा अर्ज खर्चासह मंजूर होणेस पात्र आहे. परिणामी, खालील प्रमाणे आदेश पारित करत आहे:

## **आदेश**

१. अर्ज खर्चासह मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र. ६ यांनी रूपये १००/— खर्चाची रक्कम जमा करावी, त्यापैकी त्यांनी रूपये ५०/— वादीस दयावेत व उर्वरित रक्कम जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सिंधुदुर्गला जमा करावी.

स्थळ : देवगड
दिनांक : ०३/०२/२०२०

( बी.आर.पाटील )
दिवाणी न्यायाधीश क.स्तर देवगड.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by Balkrishna Rajaram Patil
Date: 2020.02.04 10:56:18 +0530